# समग्र व्यक्तीमत्व विकास व शिक्षण

डॉ. वसुधा विनोद देव

शासकीय अध्यापक महाविद्यालय,

अकोला

– हरी ओम –

दि.:

# समग्र व्यक्तीमत्व विकास व शिक्षण

डॉ. वसुधा देव
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
अकोला.

---

आजच्या शिक्षण प्रणालीचा आपण जेव्हा समग्र विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की आज शिक्षणाने मानवाच्या सर्वसामान्य योग्यतेत वाढ झाली पण आपल्या कर्माच्या क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा योग्य वापर करण्याची क्षमता मात्र विकसीत झाली नाही कारण आज ख–या अर्थाने शास्त्र शिकविलेच जात नाही शिवाय हया शास्त्राचा योग्य अभ्यास करून त्याचे मनन करून ते आत्मसात कसे करावे हयाचे खरे शिक्षण आज दिल्या जात नाही आणि म्हणुनच मानवाच्या कृतीला जी आभा निर्माण व्हायला हवी तो होत नाही. मुळातच आज आपण ''शिक्षण '' हया संकल्पनेत खरे उतरणारे शिक्षण देत आहोत का? हा भाग महत्वाचा ठरतो. हया ठिकाणी हे विधान कदाचित धाडसाचे ठरेल पण आपण जे आपल्या बालकापर्यंत पोहोचवित आहोत ते निर्देश आहे ते शिक्षण नव्हेच कारण आपण त्यांना भरमसाट बाहय माहितीचा पुरवठा करतो आहोत. पण निर्देशन हे शिक्षण होऊ शकत नाही. निर्देश आवश्यक आहेत पण ते आमचे ध्येय नाही. शिक्षण हे ध्येय आहे व निर्देश हे साधन आहे पण आज सर्वत्र साधनावर भर जास्त आढळतो. परिणामी व्यक्तीची अंतस्थ शक्ती आज दुर्लक्षीत होते आहे. आज ख–या अर्थाने दुर्दैवाने असे म्हणावे लागते की शिक्षकांची जागा निर्देशकांनी घेतली व शांळाची जागा निर्देशनात्मक संस्थानांने घेतली आहे. स्वामी चिन्मयांनद म्हणतात, Instructions does not constitute education. Instruction is necessary and it is easy available. But education is the goal to be reached and it is to be gained by ones own reflection. Instruction is given, education is achieved. In modern time we have Instructional Institutes no educational School. Therefore we have many Instructions but hardly any teaches. ही वास्तविकता प.पु. गुरूदेवांनी व्यक्त केली आहे आणि शिक्षण संकल्पनेत भर घालतांना हयांनी शिक्षण ही मानवाची अशी संरक्षीत सुप्त शक्ती आहे जी गुरूव्दारा संरक्षित आहे अशी शिक्षणाची परिभाषा केली ''Education is nothing if it does not train our faculties to capture all our opportunities, to be useful to all other and to be always happy in ourselves" संधी प्राप्त करणे त्याचा फायदा इतरांना देणे व त्याच्या माध्यमातुन स्वतः आनंद प्राप्त करणे हया संकल्पनेच्या माध्यमातुन त्यांनी शिक्षणाला नविन आयाम प्राप्त करून दिला. खरे शिक्षण म्हणजे काय हयाची प्रभावी परिभाषा करतांना ते म्हणतात, '' "Real Education means the transformation of knowledge in to wisdom which is then used to curved out a strong character" अर्थात शिक्षणातुन " Wisdom Transformation व Character Building वर त्यांनी भर दिला. पण शिक्षणाच्या माध्यमातुन आज आपण

केवळ माहितीची दुकाने थाटली आहेत असे खेदाने म्हणावे लागते. शिक्षक हा विक्रेता व विद्यार्थी हा ग्राहक अशी भूमीका शिक्षणाच्या संदर्भात सुध्दा आपणास आढळते. परिणामी शिक्षणातुन ख-या अर्थाने ''व्यक्तीमत्व विकासाच्या'' उद्दिष्टाचा आशय हा दुर्लक्षीत झाला आहे. हया संदर्भात काही मुद्दे विचारशील बनवितात ते म्हणजे शिक्षणातून मानव्याची निर्मिती होते आहे का? शिक्षणातून व्यक्तीचे चारित्र्य निर्माण कार्य होत आहे का? शिक्षणातून व्यक्तीला जीवनाचे आकलन होत आहे का? शिक्षणातून धर्माचा खरा आशय व्यक्ती पर्यंत पोहोचला का ? संस्कृती संक्रमण, संवर्धन शिक्षणातून होत आहे का? भारतीय तत्वज्ञान अध्यात्म हयाचा परिचय व्यक्तीला होतो आहे का ? शिक्षणातून मूल्यांची रूजवण झाली आहे का ? शिक्षणातून राष्ट्र राष्ट्रीयचारित्र्य, राष्ट्रीय अस्मीता हयाचा आशय व्यक्तीपर्यंत पोहोचला का ? शिक्षणातून राष्ट्रप्रेम निर्माण झाले का? शिक्षणातून मानवाचा सर्वांगीण विकास झाला का? शिवाय स्वधर्म स्वराष्ट्र स्वभाषा स्वातंत्र्य हयाचा आशय विद्यार्थ्यापर्यंत पोहचतात का? ही सर्व प्रश्न आजच्या शिक्षणातून अनुत्तरीत राहतात. हयाचे महत्वाचे कारण म्हणजे आमची अनुकरण शीलता. आम्ही केलेले पाश्च्यात्यांचे अनुकरण. हे अनुकरण निश्चीतपणे आमच्या प्रकृतीला मानवणारे नाही. आमच्या राष्ट्राची प्रकृती ही केवळ स्थुलतेला बहिरंगाला प्राध्यान्य देत नाही तर त्याही पेक्षा महत्वाचे सुक्ष्म स्वरूप व अंतरंगाला ती प्राधान्य देते आणि म्हणुनच इतर राष्ट्राच्या विकासाची जी परिमाणे आहेत. ती आम्हाला लागु पडत नाही. विकासाच्या कोणत्याची संकल्पनेचा विचार करतांना अमलात आणतांना आम्हाला आंतरिक आणि अंतीम सत्याचा विचार करावाच लागतो. वैश्विकतेचे भान ठेवुन नव्याने हया संगळयांचे परिशीलन करण्याची आज पुन्हा आवश्यकता निर्माण झाली आहे आणि त्यासाठी विश्वकल्याणासाठी जर उपाययोजना शोधयचीच असेल तर ती आपणास हिन्दु दर्शनात शोधावी लागेल. प्राचीन सनातन सत्याचा आधुनिक संदर्भ घेऊन ती समाज मनावर रूजवावी लागेल आणि म्हणुनच भारतीय तत्वज्ञानातील व्यक्तीमत्व विकास ही संकल्पनेचा आपणास पुनर्शोध घ्यावा लागेल कारण शिक्षणाची परिभाषा करतांना आपण म्हणतो Complete development of personality is education, positive and permanent change in behavior is education. पण आता केवळ व्यक्तीमत्वाचा सर्वांगींण विकासावर व वर्तनबदलाशी निगडीत असणा-या हया संकल्पनांना आपल्याला कवटाळुन चालणार नाही. हया संकल्पना म्हणजे शिक्षणाबाबतचा अतिशय वरवरचा केलेला विचार आहे त्या ऐवजी आता आपल्याला विचार करावा लागेल तो एकात्म व्यक्तीमत्व विकासाचा अर्थात (Integrated Development of human personality ) व आत्मपरिवर्तन अर्थात Transformation कारण शिक्षण ही शिष्याची आत्मनिष्ठ ज्योत आहे. हयासाठी महत्वाचे ठरते ते व्यक्तीमत्वाला सुंदर आकार देणे, विचारांचे सौदर्यीकरण करणे आणि म्हणुनच व्यक्तीमत्वाचा विकास ही संकल्पना भारतीय तत्वज्ञानाच्या संदर्भात जाणुन घेणे महत्वाचे ठरते. कारण आज शिक्षणातुन ख-या अर्थाने व्यक्तीमत्व विकासाचा आशयच दुर्लक्षीत होतो आहे आणि म्हणुनच एकात्म व्यक्तीमत्व व त्यांचा विकास व त्याला अनुसरून शिक्षण हया मुद्यांचा विचार करणे अनिवार्य ठरते. हया साठी सर्व प्रथम एकात्म व्यक्तीमत्व ही संकल्पना आपणास स्पष्ट करावी लागते.

**<u>एकात्म व्यक्तीमत्व संकल्पना :-</u>**

व्यक्तीमत्व ही संकल्पना करण्यापुर्वी प्रत्येक व्यक्तीला तत्वज्ञानाने सांगीतलेली व्यक्तीत्व ही संकल्पना कळायला हवी. भारतीय अव्दैत तत्वज्ञानाने व्यक्तीत्वाची

अतिशय सुरेख परिभाषा केली आहे. आत्मबोधात शंकराचार्यांनी अशी परिभाषा केलेली आहे की दुषित झालेले आत्मतत्व आध्यात्मिक अज्ञान, बुध्दीमधील विक्षेप व मनात चंचलता उत्पन्न करते. मन आणि बुध्दीची उपाधी लागलेले आत्मतत्व म्हणजे व्यक्तीत्व. ही व्यक्तीत्वाची परिभाषा मनन चिंतन अभ्यासाने दृढ झाली की मग व्यक्तीमत्व ही संकल्पना समजते व ही संकल्पना जाणणे म्हणजे Self Development or Self Rediscovery होय. मग व्यक्तीला अनुभूती येते की आपल्या पैकी प्रत्येक जण केवळ देहधारी नाही तर आपल्यातील अंतभूत असणा-या शारिरीक मानसिक बौध्दीक आणि अध्यात्मिक व्यक्तीमत्वाचा चतुरस्त्र व्यक्तीभाव आहे. डार्वीन ने अतिमानवत्वाच्या पिढीची केवळ कल्पना केली होती पण भारतीय तत्वज्ञानाने त्याची अनुभूती घेण्याकरिता जगायचे असते हा Theory of Spirituo-physical Structure of man हा सिध्दांत मांडला जो पंचकोष विषयात आपणास आढळतो. हया पंचकोषातुनच अध्यात्मिक शारिरीक व्यक्तीमत्व बनते. पंचकोषातीत होवुन जीवनकेंद्र असणा-या आत्मतत्वाची अनुभूती होणे हे खरे तर मानवी जीवनाचे ध्येय आहे. हया पंचकोषांना वेगळे अस्तीत्व नाही तर हया पंचकोष मिळुन स्थुल शरीर, सुक्ष्म शरीर व कारण शरीर बानतात व हया पाचही कोषाचा निरास करून आत्मतत्वाचे ज्ञान प्राप्त करणे हा खरा व्यक्तीमत्वाचा विकास आहे.

स्थुल आणि सुक्ष्म शरीराचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा एक बाब लक्षात येते की भौतिक शरीर हा मानवी व्यक्तीमत्वाचा असा स्थुल भाग आहे जो पंचज्ञानेद्रीय व पंचकर्मेद्रीय युक्त असतात. व्यक्तीपरत्वे देहाचे आकार बदलतील पण ती ज्या मुलद्रव्याची बनलेली असतात ती द्रव्ये व अवयवाची कार्य मात्र सारखीच असतात. हया सर्वाचा अर्थ व्यक्तीमत्वाच्या रचनेतील बदलणारा जो घटक आहे तो म्हणजे मन आणि बुध्दी जो शैक्षणिक दृष्टीकोनातुन महत्वाचा आहे आणि म्हणुनच **मनाचे संस्करण व बुध्दीचे प्रबोधन ही बाब व्यक्तीमत्व विकासाकरिता महत्वाची ठरते** व नेमके आज आपणास आढळते की मानवाच्या मन आणि बुध्दीची फारकत झाली आहे. आज मानवाचे वर्तन घडते ते केवळ मानसिकतेतुन व त्यावर भावनांचा पगडा असल्याने त्याच्या वर्तनात विवेक राहणे शक्य नाही. शिवाय मानवाच्या मन आणि बुध्दीचे जे कार्य चालते ते त्याच्यातील वासने नुसार अर्थात जशा मानवाचय वासना असतील त्यनुसारच त्याचे वर्तन घडते आणि म्हणुन शैक्षणिक दृष्टीकोनातुन जर विचार केला तर त्याच्या वासनांना योग्य वळण व दिशा देणे ही बाब महत्वपुर्ण ठरते आणि म्हणुनच ख-या अर्थाने **वासंनाची पुनर्ससन हीच मानवाच्या व्यक्तीमत्वाची पुनर्बाधंणी ठरते**. हया वासंनाचे पुनर्वसन केल्यास मन आणि बुध्दी सुसंवादी होतात. व्यक्तीमत्वाची ही पुनरचना राष्ट्राच्या पुनर्रचने करिता फायदेशीर ठरते म्हणुनच आपल्यातील हया अंतर्गत उपकरणाचा अभ्यास करणे ही बाब महत्वाची आहे त्याचे स्वरूप समजुन घेणे आवश्यक आहे हयाठिकाणी मन ही संकल्पना प.पू. स्वामी चिन्मयानंदांनी नदीच्या रूपकाव्दारे अतिशय सुंरदपणे स्पष्ट केली आहे. नदी म्हणजे पाण्याचा प्रवाह त्याच प्रमाणे मन म्हणजे विचारांचा प्रवाह होय. प्रवाहामुळे नदीला गतीमानता प्राप्त होते विचारांमुळे मनाला गतीमानता प्राप्त होते आणि म्हणुन वेगाने वाहणारे पाणी म्हणजे नदी व वेगाने वाहणारे विचार म्हणजे मन. पणी गढुळ तर नदी खराब त्याच प्रमाणे विचार वाईट तर मन वाईल **म्हणजेच विचार हा मनाची गुणवत्ता ठरविणारा घटक आहे आणि म्हणुनच हया विचांरो सौदर्यीकरण करणे ही बाब महत्वाची ठरते**. बुध्दी ही वास्तविक जड आहे पण त्यात जाणीवतत्वाचा प्रकाश पडतो तेव्हा ती सचेतन बनते व ती कार्य करू लागते. तर्क विचार विवेक करू लागते

बुध्दीच्या स्तरावर Power of discrimination च्या वापरामुळे कृती ही Dynamic, productive बनते बुध्दीचा योग्य वापर करणे हे यशाचे रहस्य असते. मानवाची ही अंतर्गत उपकरणे विकसित असतील तरच त्याचा व्यक्तीमत्व विकास हा शक्य आहे. अर्थात व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचे वर्गीकरण करायचे असेल तर निश्चीतपणे मन आणि बुध्दीच्या आधारावर करावे लागेल ते पुढील प्रमाणे.

१) मनापेक्षा बुध्दी प्रभावी
२) बुध्दीपेक्षा मन प्रभावी
३) मन आणि बुध्दी दोन्ही विकसित
४) मन आणि बुध्दी पुर्ण अविकसित

हे चार व्यक्तीमत्वाचे प्रकार पडत असले तरी जर मानवाला आपल्या व्यक्तीमत्वाचा जर विकास घडवुन आणायचा असेल तर उच्च स्तराचा त्याला विचार करावा लागेल पण त्याच सोबत निम्नस्तराचे तादात्म्याचा त्याला त्याग करावा लागेल. स्थुलाकडुन सुक्ष्माकडे जाणारा हा व्यक्तीमत्व विकासाचा विचार आहे. **व्यक्तीमत्व उत्क्रांत करणे म्हणजे सुक्ष्मतेकडे वाटचाल करणे** अर्थात सुक्ष्मतेकडे वाटचाल करतांनाच स्थुलाचा त्याग महत्वाचा ठरतो. शरिर-मन-बुध्दी-आत्मा हे चार घटक म्हणजे व्यक्तीमत्व विकसनाचा मार्ग आहे जर मानवाला ख-या अर्थाने आपली प्रगती करून घ्यायची असेल तर त्याने स्वत:मधील निन्म स्तराला स्वत: उन्नत केले पाहीजे. **हया साठी व्यक्तीचा आदर्श काय आहेत ही बाब महत्वाची ठरते**. अर्थात आपण कसे असावे हया बाबत प्रत्येक व्यक्तीची धारणा असते पण ही धारणा केवळ विचाराच्या स्तरावर असते. जर बौध्दिक पातळीवर हे कळले असेलही पण शारीरिक व मानसिक पातळीवर व्यक्ती परपस्पर विरोधी वर्तन करतो प्रत्यक्षातील मी आणि आदर्शातील मी हे अंतर मग वाढत जाते हयाचे महत्वाचे कारण म्हणजे मानसिक स्तरावर माझ्याबद्दल मी रेखाटले चित्र. हया माझ्या चित्राचे बौध्दिक स्तरावर निर्णय पक्का होत नाही परिणामी ती बाब शारीरिक स्तरावर आचारणात येत नाही. हयाचे कारण आपल्यातील विकाराची प्रबळता आणि व्यक्तीमत्व प्रगटीकरणाचा महत्वपुर्ण घटक म्हणजे बुध्दी आहे. हया उपकरणाशी आपल्यातील निन्मस्ताराच्या च्यक्तीमत्वाचे ऐक्य आपणास घडवुन आणावे लागेल. ज्यावेळी व्यक्तीची तर्कनिष्ठा व विवेक शक्ती ही इंद्रीयाच्या मागे धावणा-या मनावर अधिकार गाजवायला लागेल त्याचवेळी निम्न स्तरीय व्यक्तीमत्वाला वळण लागते. शिस्त लागते. **निम्न व्यक्तीमत्वास उच्च व्यक्ती मत्वासोबत समरस व्हायला भाग पाडावे लागेल पण त्यासाठी उच्च व्यक्तीमत्वाची क्षमता वाढविणे जेवढे महत्वाचे आहे तेवढेच निम्न व्यक्तीमत्व उच्च व्यक्तीमत्वाच्या अधिपत्या खाली येण्यासाठी उपलब्ध करणे ही बाबही महत्वाची ठरते**. निम्न व्यक्तीमत्वाचे उच्च व्यक्तीमत्वास शरण जाणे ही क्रिया महत्वाची ठरते अर्थात निम्न व्यक्तीमत्व व उच्च व्यक्तीमत्व महान मित्र बनावयास हवे हा समन्वय अत्यंत महत्वाचा ठरतो.

- दुस-या बाजुनेही आपणास व्यक्तीमत्वाच्या समन्वयाचा विचार करता येतो तो असा की आपल्या व्यक्तीमत्वाच्या प्रत्येक स्तरावर आपण जीवनाकडे विशीष्ट दृष्टीकोनातुन पहात असतो व त्यानुसार वस्तुमात्राबद्दल आपण आपले निष्कर्ष काढतो. हे निष्कर्ष प्रत्येक स्तरावर वेगवेगळे असतात. हया अनुभवातुन व्यक्तीला प्रत्येकच स्तरावर आंनद व सुख प्राप्त होईलच असे नाही व असे घडले नाही तर त्याच्या व्यक्तीमत्वात आंतर विरोध निर्माण होतो. एखाद्या गोष्टीला शारीरिक

स्तरावरून अनुभव होत असतांना त्यातील अपुर्णतेच्या जाणीवेने दु:ख होईल पण तीच बाब मानसिक कौतुकाचा भुलावा दिल्यास व्यक्तीला दु:ख होणार नाही. जी बाब शारीरिक दृष्टया घृणास्पद आहे, मानसिक दृष्टया लज्जास्पद आहे तीच गोष्ट बुध्दीच्या स्तरावर जाणल्यास खिन्नता येत नाही व ज्या बाबीमुळे शारीरिक मानसिक बौध्दिक बाबीमुळे नैराश्य खिन्नता निर्माण झाली असेल तीच बाब व्यक्ती जेव्हा अध्यात्मिक स्तरावर पाहते तेव्हा ती मनाला प्रचंड उत्साह देवुन जाते. आणि म्हणुनच **जीवनातील अव्हानांकडे अध्यात्मिक दृष्टीकोनातुन पाहण्याचे संस्कार व्यक्तीवर होणे आवश्यक आहे**. शिवाय प्रत्येक अव्हान हे शारीरिक मानसिक भावनिक व अध्यात्मिक पातळीवरून पहात असतांना एकाच निष्कर्षाप्रत येत असतील तर ते व्यक्तीमत्व सर्वश्रेष्ठ व्यक्तीमत्व होय. व ही पात्रता व्यक्तीमध्ये निर्माण होणे महत्वाचे आहे.

- व्यक्तीमत्वाच्या एकात्म विकासाचा विचार हयाही दृष्टीने करता येतो तो म्हणजे मानवाच्या ओढ आपल्या मूळ स्वरूपाकडे जाण्याची असते अर्थात आपल्या सुक्ष्म व्यक्तीमत्वाच्या प्राप्ती साठी धडपडणे ही मानवाची सहजवृत्ती असते व हयाकरिता तो स्थुल व्यक्तीमत्वाचा त्याग करावयास तयार असतो. मानसिक समाधान हे शारीरिक समाधानापेक्षा श्रेष्ठ असते बौध्दिक समाधान हे मानसिक समाधानापेक्षा तर आध्यात्मिक समाधान हा सर्वाचा कळस असतो. जीवनातील उच्चकोटीचा आनंद प्राप्त करण्यासाठी तो स्थुल स्वरूपाचा समाधानाचा त्याग करतो. उदा:- आई आपल्या अपत्याच्या सेवेचा आंनद प्राप्त करित असतांना शरीर व्यथेची तमा बाळगत नाही. सिमेवरील सैनिक देशाच्या रक्षणासाठी प्राणत्यागणाची तयारी दर्शवितो. **जसजशी व्यक्ती सूक्ष्म व्यक्तीमत्वाशी तादाम्य पावते तसतसे त्याच्या व्यक्तीमत्वाचे सुसंघटीकरण होत जाते अशा हया सुसंघटीकरणातुन शारीरिक दृष्टया आरोग्य संपन्न, मनाने आनंदी बुध्दिने तिक्ष्ण, आत्मिक दृष्टया स्थीर अशा सामर्थ्यवान माणसाचा समाज निर्माण होतो**.

अर्थात वरिल सर्व विवेचनावरून एकात्म व्यक्तीमत्वाच्या बाबतीत आपल्याला म्हणता येईल की एकात्म व्यक्तीमत्वाचे चार स्तर असतात. शारीरिक मानसिक बौध्दिक अध्यात्मिक ही चारही स्तर हे क्रमाने सूक्ष्म होणारे आहे व्यक्तीमत्व हे स्थुलाकडून सुक्ष्माकडे विकसित होणारे असते **सूक्ष्म होणे म्हणजे विकसित होणे सुक्ष्म होणे म्हणजे व्यापक होणे. अशी आपणास व्यक्तीमत्व विकासाचा विचार करता येईल**

१) मानवाच्या हया चारही व्यक्तीमत्वाच्या प्रेरणा हया निराळया असतात व हया प्रेरणांचा आलेखही अधिक सूक्ष्म व व्यापक असा होणारा असतो शारीरिक स्तरावर शरीर सुखाची प्रेरणा, मानसिक स्तरावर शांतीची प्रेरणा, बौध्दिक स्तरावर ज्ञानाची प्रेरणा व आत्मिक स्तरावर तादात्म्य भाव अशा प्रेरणांचा क्रमविकास व त्यांतील समन्वय आपल्यला एकात्म व्यक्तीमत्वात आढळतो.

२) मानवाच्या व्यक्तीमत्वाचा जसजसा विकास होतो तसतसा त्याची स्वची कल्पनाही अधिक व्यापक होते. आणि मग त्याच्या व्यक्तीमत्वाचा परिघ हा अधिक वाढतो व्यापक होतो तो समाज निसर्ग व वैश्विक स्तरावर त्याचा व्यक्तीमत्व विकास घडुन येतो. हयाचे महत्वाचे कारण व्यापक होणे ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे पण हया सहजप्रृत्तीची जाणीवच मुळात आपल्यातील चैतन्य व जगातील चैतन्य हयांच्या अव्दैतातुन निर्माण होते आणि मग मानवाच्या व्यक्तीमत्वाला वैश्विकता प्राप्त होते. भौतिकते कडुन अध्यात्मिकतेकडे जाणारा हा क्रमविकास हा Integrated Personality Development चे लक्षण आहे पण हया करिता **मानवाचा कोणताही स्तर दुर्लक्षीत**

**<u>करून तर चालणार नाहीच पण प्रत्येक स्तराचा क्रमबध्द विकास महत्वाचा ठरतो</u>.** व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकास हा सुसंघटीत झाला तर समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास घडुन येईल हयासाठी शिक्षणाची भूमिका महत्वाची ठरते. कारण आज विविध जागातिक अव्हाने पेलण्यास आजची शिक्षण प्रणाली जरी सक्षम असली तरी आजचे शिक्षण हे जीवनाचा दर्जा उंचावत नाही. कारण आज केवळ Standard of Living चाच विचार सर्वत्र होतांना आपल्या लक्षात येतो त्या मानाने Standard of Life चा विचार फारसा कोणी करत नाही. परिणामी आज मानवाचे व्यक्तीमत्वाचे विघटन होत आहे. व त्यामुळे मानवातील गुन्हेगारी वृत्ती वाढते आहे आज आपण केवळ डोक्यात माहिती कोंबणारे शिक्षण देत आहोत. पण त्यामुळे जीवनमूल्य दुर्लक्षीत होत आहे. मूल्याधिष्ठीत शिक्षण मूल्यशिक्षण हया संकल्पना केवळ वापरून आता भागणार नाही तर व्यक्तीमत्व विकसनासाठी त्याचा आता गांभिर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. आज मानवाच्या बुध्दिचा विकास झाला असला तरी त्याचा मनाचा मात्र विकास झालेला आपणास आढळत नाही. त्यामुळे जीवनात एकप्रकारची कुरूपता निर्माण झाली आहे. आणि म्हणुन आपल्याला शिक्षणातून सर्वात जास्त भर द्यावा लागणार आहे तो मनाच्या जडणघडणीवर. आज समाजात जे जे गुन्हेगारी वृत्तीचे लोक आढळतात त्यांचे बालपण हे निश्चीत पणे दुर्लक्षीत झाले आहे. मानसिक विकासाशिवाय आपण केवळ बौध्दिक विकासाची कल्पना करू शकत नाही व बौध्दिक विकास हा मानसिक विकासाचाच वाढीव परिघ आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. आणि म्हणुन केवळ माहितीच्या आधारे बालकाचा बौध्दिक विकास करणे ही संकल्नाच एकांगी ठरते हया समन्वयात्मक विकासासाठी बालक शिक्षणाच्या अभ्यासाच्या एक आराखडाच दिला आहे. बालकांच्या योग्य क्षमतेचा विकास योग्य पध्दतीने झाला तर त्याच क्षमतांचा योग्य वापर करण्याची क्षमता त्यंच्या अंगी निर्माण होईल हया दृष्टीने आज शिक्षणाला ज्या महत्वाच्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करायचे आहे ते ध्येय म्हणजे Integrated Development of Personality चा हया ध्योयाशीच निगडीत अशा शिक्षणाचा विचार आज आपल्याला करावा लागेल.

व हया दृष्टीने शिक्षणाची पुनर्रचना करतांना दोन विचार प्रवाह महत्वाचे आहेत.

१) आहे त्या प्रणालीत परिपुर्णपणे बदल करणे

२) जी शिक्षण प्रणाली आज सुरू आहे त्याच प्रवाहात काही बाबीचे विचार करणे.

पणआजच्या शिक्षणप्रणालीचा विचार केल्यास ती बरीचशी भरकटल्यासारखी व मूळ ध्येयापासून दूर गेल्यासारखी आपणास भासते आहे. आणि म्हणुन खालील प्रमाणे शिक्षणाबाबतचा विचार महत्वाचा ठरतो.

**व्यक्तीमत्व विकास व शिक्षण :-**

समग्र व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीकोनातुन शिक्षणाचा विचार करावयाचा झाल्यास त्यात खालील मुद्यांचा विचार करावा लागेल.

१) शिक्षण संकल्पना

२) शिक्षणाची ध्येय

३) अभ्यासक्रम अंतर्भरण

४) अध्ययन अध्यापन पध्दती

५) गुरूशिष्य संबंध
६) शिस्त संकल्पना

वरिल आठ पंदाचा विचार करून शिक्षणाचा पदबंध आपणास तयार करावा लागेल त्याचा विचार पुढील प्रमाणे

**१) शिक्षण संकल्पना :-**

शिक्षणाची परिभाषा करतांना "व्यक्तीमत्वाचा एकात्म विकास म्हणजे शिक्षण" हीच संकल्पना आपणास अधिष्ठीत ठेवावी लागेल. तसेच शिक्षणाचे भारतीय करण करणे हा दृष्टीकोण ठेवावा लागेल.

**२) शिक्षणाची ध्येय :-**

(शिक्षणाची ध्येय ठरवितांना आज जे Brain Oriental आहे त्यातुन सुटका करून शिक्षण Mind Oriental करणे हा दृष्टीकोण ठेवुन पुढील ध्येयांचा विचार महत्वाचा ठरते.)

१) शिक्षणातून एकात्म व्यक्तीमत्व विकास व्हावा
२) आत्मसंयमाचा विकास करणे
३) शांतता हया स्वभावाची निर्मिती करणे
४) योग्य मार्गाची निवड करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे
५) आंतरिक व्यक्तीमत्वाचा विकास
६) अध्यात्मिक विकास
७) आत्मप्रभुत्व प्राप्त करणे

वरिल प्रमाणे शिक्षणाची ध्येय ठरवावी लागतील हयापुर्वी विषद केल्याप्रमाणे शिक्षणप्रक्रियेच्या परिवर्तनाचा निर्णय हा योग्य निर्णय ठरेल कारण आज वर्तमान पीढी आपल्या हाती आहे. शिवाय आज विषय निर्धारणाच्या संदर्भात अत्यंत गोंधळाचे संभ्रमाचे वातावरण आहे. करिता शिक्षणाचा स्वंतत्रपणे आपल्याला विचार करावा लागेल.

**अभ्यासक्रम अंतर्भरण** :-

अभ्यासक्रमाचा विचार करतांना जसा आपल्याला विकासाचा आकृती बंध हा पक्का करावा लागेल हा विचार करतांना बाल मानसशास्त्रातील हया तत्वांचा विचार आपणास करावा लागेल की प्रत्येक बालक त्याला आवडणा-या क्रियेत रममाण होतो तसेच त्याला जेथे महत्व दिले जाते असे वाटते तेथेच तो रमतो. हया दोन तत्वाचा विचार करून अभ्यासक्रमाच्या अंतर्भरणाचा विचार करतांना तो दोन पध्दतीने आपणास ठरविता येईल.

१) बालकाचा कल असणारा अभ्यासक्रम (विशेष अभ्यासक्रम)
२) सर्वसामान्य अभ्यासक्रम

**१) विशेष अभ्यासक्रम :-**

बालकामध्ये ज्ञान अभिरूची हया सुप्तावस्थेत असतात त्याचा अभ्यास करून त्याच्या अभिरूचिचे अध्ययन करून बालपणापासुनच त्याला त्या विशीष्ट विषयात तत्विक, प्रात्याक्षिक, संशोधन हया मार्गाने आपणास त्याला उच्च शिक्षणापर्यत नेता येईल ज्या विषयात किंवा ज्या कलेत त्याचे अभिरूची आहे त्याबाबत त्या कलेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तात्विक विवेचन, त्याचा विकास त्या बाबतचे प्रत्यक्ष सराव व

उच्च शिक्षणात त्याबाबत संशोधन हया मार्गाने गेल्यास एका विशीष्ट क्षेत्रातील त्याचे ज्ञान कौशल्य अभिवृत्ती हया तीनही स्तरावर त्याच्यात विकास घडुन येईल त्याचे पांरगत्व निर्माण होईल हे सर्व करण्यासाठी त्या विशीष्ट विषयांचे तज्ञांचे सहकार्य हया ठिकाणी महत्वाचे ठरते. हया विशेष अभ्यासक्रमाची व्याप्ती व्यापक असेल भारतीय तत्वज्ञान कला साहित्य, विज्ञान, गणित, कृषी, उद्योग इ. या सारख्या विषयांचा हयात अंतर्भाव असेल पण हयापैकी केवळ एकाच विषयाचे सखोल अध्ययन हया ठिकाणी पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण हया सर्व स्तरावर अपेक्षीत ठेवावे हया संदर्भात वैश्विकतेचा विचार करावा पण हया सर्वाची मातृभूमी भारत आहे हा दृष्टीकोण ठेवुन मग त्याचे तुलनात्मक अध्ययन आणि तेही उच्च स्तरावर आपणास देता येईल पण तो पर्यंत भारतीय संदर्भाच्या आधाराने त्याचे तात्विक अधिष्ठान पक्के करायला हवे. हया ठिकाणी बालकाच्या अभिरूचीचा विषय त्याला बालपणापासुन मिळाल्यामुळे त्याचे त्या विषयातील प्राविण्य संपादन करू शकेल शिवाय हया ठिकाणी भारतीय इतिहासाच्या पार्श्वभूमीवर त्याला ते ज्ञान प्राप्त होत असल्यामुळे शिक्षणाचे भारतीयकरणात त्याचे योगदान महत्वाचे ठरेल हयासाठी विविध स्तरावर त्याचे खालील प्रमाणे अध्ययनाची योजना असायला हवी.

१) पुर्वमाध्यमिक - अभिव्यक्ती
२) प्राथमिक - अभिव्यक्ती
३) माध्यमिक स्तर - प्रात्याक्षिक
४) उच्च माध्यमिक - प्रात्याक्षिक-तात्विक
५) उच्चस्तर - तात्विक+प्रात्याक्षिक+संशोधन
६) उच्च शिक्षण - संशोधन

हा क्रम विशेष शिक्षणात ठेवण्यास हवा.

**<u>सर्वसामान्य अभ्यासक्रम :-</u>**

सर्वसामान्य अभ्यासक्रम ही संकल्पना अशा अभ्यासक्रमाशी निगडीत आहे ज्या बालकांची अभिरूची एका विशीष्ट क्षेत्रात नाही हया सर्वसामान्य अभ्यासक्रमात सुध्दा ज्ञान कौशल्य व अभिवृत्ती हाच विकासाचा क्रम असावा पण हयात विषय निवडतांना मात्र खुप कसब पणाला लागेल शिवाय सर्वसामान्य अभ्यासक्रमात एक विशीष्ट प्रकारची विषयांची अनिवार्य चौकट नसेल पण विद्याशाखांच्या दृष्टीकोनातुन विषय निवडण्याचे स्वातंत्र्य माध्यमिक स्तरापासुन मुलांना असेल पण हया अभ्यासक्रमात ३ विषय मात्र अनिवार्य असतील व हे विषय म्हणजे -संस्कृत - इतिहास - नागरिक शास्त्र संस्कृतचे अध्ययन हे आता केवळ प्राचीन भाषा म्हणुन नाही तर सर्व ज्ञानाची जननी म्हणुन आणि आधुनिक समजल्या जाण्या—या शास्त्राची जननी म्हणुन अनिवार्य करता येईल इतिहास हया विषयात केवळ चळवळी क्रांती हयावर भर नसावा तर भारताचे वर्तमान उज्वल करणा-या सर्व सद्‌गुणांचा इतिहास त्यात असावा म्हणजे हया मूल्यसंघर्षाच्या काळात मूल्यनिर्णयाची क्षमता व्यक्तीच्या अंगी येईल. शिवाय भारतीय लोकशाही स्वांतत्र्य हया सर्व संकल्पना समजण्यासाठी तसेच उत्तम नेतृत्व निर्माण करण्यासाठी सर्वात महत्वाचे म्हणजे उत्तम नागरिक बनण्यासाठी हे विषय अगदी प्राथमिक स्तारापासुन ते उच्च स्तरापर्यत अनिवार्य असावे व हया सर्वाचा अभ्यास मातृभाषेतुन असावा परकीय भाषेचा विचार हा ज्ञानभाषा म्हणुन करायला हरकत नाही. पण भारतीय भाषा समृध्दीसाठी त्याचा उपयोग व्हावा. हया तीन विषयाच्या व्यतीरिक्त विद्याशाखा व त्यातील इतर विषय निवडण्याचे स्वांतत्र्य हया बालकाला असायला हवे.

अभ्यासक्रमाचे हे अंतर्भरण म्हणजे मानसिक प्रशिक्षणाची योजना आहे आणि म्हणुनच ध्यान आणि योग हया बाबी महत्वाच्या ठरतात आणि हयासाठी शालेय वेळेच्या व्यतीरिक्त त्याचा दैनंदिन जीवनक्रमात हयासाठी वेगळा वेळ राखुन द्यावे लागेल व हयाची जबाबदारी पालकांकडे द्यावी लागेल. त्याच्या निरिक्षणाचे व मूल्यमापनाची वेगळी यंत्रणा यासाठी बनवावी लागेल. कारण मुळातच शिक्षणाला आपण Mind Oriented बनविले तर त्याचा क्रमविकासाच्या नैसर्गिक सिध्दांताव्दारे त्याचे बौध्दिक विकासात रूपांतर होणार आहे. मुळातच सर्व विषय अनिवार्य करणे, विविध विषयाचा अंतर्भाव त्यात करणे, अनेक प्रकारची माहिती विद्यार्थ्याच्या डोक्यात कोंबणे शिवाय त्या प्रत्येक माहितीचा त्याच्या आयुष्याशी खुप संबध असतोच असे नाही अशी कृत्रिमता आपल्याला शिक्षणातुन बालवयाची आहे कारण आज आपण केवळ शिक्षण हे बालककेंद्री आहे असे म्हणतो पण हया बालकेंद्री शिक्षणात बालकांचा विचार कोठेच नाही त्याच्या मनाचा विचार कोठेच नाही बालकाचे मन हा स्वच्छ आरसा असतो हया आरशाची ही निर्मळता कायम ठेवणे ही शिक्षणाचीच जबाबदारी आहे. हया दृष्टीकोनातुन वरिलप्रमाणे केवळ अभ्यासक्रमाचे अंतर्भरण हया ठिकाणी अतिशय संक्षिप्त पणे देण्यात आले आहे.

<u>**पालक शिक्षण:-**</u>

लहानपणापासुनच बालकाला ध्यानसाधनेचा अभ्यास महत्वाचा ठरतो ध्यानसाधनेने मनाची शक्ती वाठविता येते मनाची एकाग्रता वाढविता येते. ध्यान योगाचे हे प्रशिक्षण व्यक्तीमत्व विकसनात अतिशय फायद्याचे ठरेल. वरिल दोन्ही प्राकरचे स्वयंअध्ययन विद्यार्थ्याकडुन अपेक्षीत असेल तर त्यासाठी पालक प्रशीक्षण हे अनिवार्य असते. पालक जर सुसंस्कृत असतील व सर्वात महत्वाचे आपल्या पाल्याच्या मानसिक विकासाठी वेळ देण्याची तयारी असेल तरच हया बाबी साध्य होतात. पण नेमकया हयाच बाबी आज दुर्मिळ होत चालल्या आहेत. ही अत्यंत खेदाची बाब आहे आणि हयासाठी अभ्यासक्रम अंतर्भरणात खालील तिसरा घटक अनिवार्य वाटतो तो म्हणजे पालक प्रशिक्षणाचा ज्यावेळी आईवडील होण्याची चाहुल पालकांना लागते त्याच दिवशीपासुन त्याच्या प्रशिक्षणाला प्रारंभ करण्यात यावे हयात. भारतीय संस्कृतीचे शिक्षण, अध्यात्मिक शिक्षण, ध्यानसाधना, संगोपन शास्त्र, संस्कार शास्त्र, बालमानस शास्त्र, इ. विषयाचे अध्ययनाच्या आधारे पालक शिक्षण हे अनिवार्य करणे आवश्यक आहे. हे बालकाचे जन्मपुर्व शिक्षण आहे. कारण Our children are our future हा महत्वपुर्ण विचार हया ठिकाणी आहे.

<u>**अध्ययन अध्यापन पध्दती :-**</u>

अध्ययन अध्यपन पध्दतीच्या संदर्भात सर्वात महत्वाचा मुद्या ठरतो की ये हृदयीचे ते हृदयी घातले हा अध्ययन अध्यापनाचा गाभा आहे. विविध आंतरक्रियात्मक आधुनिक अध्यापन पध्दतीचा विचार हया ठिकाणी योग्य ठरेल पण अध्ययनाच्या संदर्भात सुरवातीपासुन आत्मनिरिक्षण पध्दतीचे प्रशिक्षण आपण बालकाला द्यायला हवे. हया संदर्भात स्वामी चिन्मयांनद म्हणतात, ''Introspection and self analysis is the

only method to learning to know ourselves, Rgular practice, in detaching ones ego from oneself and watching it with pure imparial judgement is introspection" आत्मपरिक्षण पध्दत ही व्यक्तीगत विकासाकरिता आवश्यक आहे प.पू. गुरूदेव म्हणतात, "एकदा तुमची व्यक्तीगत व्यंगे मत्सर लालसा क्रोध, द्रवलोभ, स्वार्थबुध्दी, तुम्हला कळुन आली आणि हे दुर्गुण नष्ट करून तुम्ही त्याच्या अगदी विरूध्द असलेले दिव्य गुण भक्ती श्रध्दा शांतता, समचित्तता, मनाचा उदारणा, सर्वाबद्दल निस्वार्थी प्रेम, इत्यादी विकसित करता आले तर तुम्हाला आढळुन येईल की तुम्ही निश्चीतपणे पुर्वीपिक्षा अधिक सुखी झाले आहात. तुम्हाला अधिकाधिक यश मिळत जाईल पुष्कळ लोकांना तुम्ही हवेसे व्हाल अजाणता तुम्ही आपल्या सभोवती सर्वत्र आंनद पसरविण्यास सुरवात कराल " ही बाब केवळ स्वयशोधनाने आत्मनिरिक्षणाने शक्य होईल हयासाठी अगदी प्राथमिक स्तरापासुन बालकाला पालकांनी खालील चार घटकांची सवय लावावी.1) Introspect 2) Detect 3) Negate 4) Sbustitute हया चार कृतीचे प्रशिक्षण महत्वाचे ठरते ही बाब सवयीत परिवर्ततीत व्हावी चांगल्या सवयी म्हणजे चारित्र्य ही परिभाषा स्वामी विवेकानंदानी केली होती.

**गुरूशिष्यसंबध :-**

आज शिक्षण क्षेत्रात हया महत्वपुर्ण विषयाचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. शिक्षण विद्यार्थी आंतरक्रिया अधिक सक्षम कराव्या लागतील त्यासाठी शिक्षकांच्या ठिकाणी दृष्टीकोण मूल्ये व अभिवृत्ती कशी विकसित होतील हयाचा विचार हया ठिकाणी महत्वाचा ठरतो व हया ठिकाणी पुनश्च शिक्षण प्रशिक्षणाचा विचार महत्वाचा ठरतो तसेच विद्यार्थी म्हणुन बालकामध्ये अशा सदगुणांची निर्मिती महत्वाची ठरते जेणेकरून शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया हया सशक्त होतील कारण शिक्षक व विद्यार्थी हे शिक्षण प्रक्रियेचे महत्वपुर्ण घटक आहेत धृव आहेत. हया दोन धृवामध्ये योग्य ताळमेळ असण्याची आवश्यकता आहे प.पु. गुरूदेव म्हणतात,"गुरूशिष्यात जेव्हा प्रेमाचे विशीष्ट संबंध निर्माण होतात तेव्हाच कोठे त्यांना आपल्या शिष्याला समर्थपणे शिकविण्याची स्फुर्ती येते.'' तु पैसे दे मी शिकवितो अशी व्यापारी वृत्ती गुरूशिष्यात नसावी ज्याठिकाणी प्रेम मित्रत्व स्वांतत्र्य परस्पर समज हयाचे सहानुभूतीचे वातावरण असते अशाच ठिकाणी बुध्दीचा व मनाचा विकास होतो. हा गुरूशिष्य संबंधाचा हा आयाच म्हणजे मार्गदर्शनाचा गाभा आहे.

**शिस्त आणि स्वांतत्र्य :-**

बाहेरून लादलेली शिस्त ही ख-या अर्थाने शिस्तच नव्हे तर शिस्त ही स्वयंशीस्तीत परिवर्तीत व्हायला हवी आंतरिक शिस्त महत्वाची आहे हयासाठी विद्यार्थ्यांना हया प्रकियेत सहभागी करून घेता येईल. काही नियमाशिवाय स्वांतत्र्य ही संकल्पनाही सिध्द होत नाही हा आशय त्यांच्यापर्यंत पोहोचवावा लागेल.

वरिल सर्व संकल्पना जर प्रत्यक्षात उतरवायच्या असतील तर त्याला धर्माचे अधिष्ठान देणे महत्वाचे ठरेल. अर्थात सनातन जीवनदृष्टी हा सर्व शिक्षण प्रणालीचाच गाभा असायला हवा.

वरिल सर्व घटक फक्त तात्वीक स्तरावर देण्यात आले आहे. हया सर्व बाबी प.पू. स्वामी चिन्मयानंदाच्या शिक्षणविषयक विचारात अभिव्यक्त होतात. हया आशयाला धरून लेखिकेले अभ्यासक्रमाचा विस्तृत आराखडाच तयार केला आहे हा

केवळ एक सारांश आहे. स्वामी चिन्मयानंद हया शैक्षणिक विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास हया संशोधनाचा हा एक भाग आहे.

———————